●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक ११९ ●मंगळवार, दि. २९ जुलै २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये
● Beed (Maharashtra) ● Year 5 ●Issue 119 ● Tuesday, 29 July 2025 ● RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ● Page 1 ● Pages 4 ●Price 3 Rs.




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




बीड ● dailymarathwadapatra2021@gmail.com ●https://marathwadapatra.com ●https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# 'तू गलत भी है, तू कातिल भी हैं... धनंजय मुंडेंनी माझी वंजारी जात बदनाम केली'

## शिवराज बांगर यांचे धक्कादायक आरोप



**बीड । प्रतिनिधी**

संतोष देशमुख खून प्रकरणातला मुख्य आरोपी वाल्मिक कराड हा धनंजय मुंडेंचा उजवा हात होता. त्यामुळेच धनंजय मुंडेंना आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतरही अनेक आरोप धनंजय मुंडेंवर होत आहेत. त्यामुळे ते मागच्या काही दिवसांपासून शेरोशायरीमधून व्यक्त होताना दिसून येत आहेत. त्यांचं म्हणणं आहे की, माझी वंजारी जात, माझा बीड जिल्हा काही लोकांना बदनाम केला.

धनंजय मुंडे रवारी ठाण्यात वंजारी समाजाच्या मेळाव्याला हजर होते. तेव्हाही त्यांचा तोच सूर होता. त्यांच्या शेरोशायरीला बीड येथील वंचित बहुजन आघाडीचे माजी पदाधिकारी आणि वंजारा समाजाचे नेते शिवराज बांगर यांनी जशास तसं उत्तर दिलं आहे. 'तू गलत भी है.. तू कातिल भी हे' अशी शायरी त्यांनी सादर केली.

मंत्रिपद गेल्याच्या नेराश्येतून धनंजय मुंडेंनी कालचं भाषण केलं. महादेव मुंडेंना न्याय देण्याच्या बाबतीत त्यांनी एकही शब्द काढली नाही. बापू आंधळेंची हत्या ही कुणी केली, हे धनंजय मुंडेंनी भगवानबाबांच्या समाधीवर हात ठेऊन सांगावं.. असं आवाहन शिवराज बांगर यांनी केलं. ते सोमवारी बीडमध्ये आयोजित पत्रकार परिषदेमध्ये बोलत होते.

**शिवराज बांगर यांची शायरी**

तू गलत भी है, तू कातिल भी हैं
वाल्मिक की हर गुनाह में तू शामिल हैं
आज तुझे मील रही हे क्लिन चीट
किस्मतवाला है तू आज सरकार तेरी हैं
सब कर मेरे दोस्त कल बारी हमारी है।

धनंजय मुंडेंमुळे वंजारी जात बदनाम झाली- धनंजय मुंडे साहेब तुमच्यामुळे वंजारी जात बदनाम झाली. तुम्ही वाल्मिक कराड आणि तुमच्या पाच टक्के लाभार्थ्यांमुळे वंजारी समाजाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलं आहे. माझी जात खून करत नाही, खंडण्या घेत नाही.. हे लक्षात ठेवा. त्यामुळे जातीच्या आडून दडून बसणं बंद करा.

▶▶ उर्वरित पान २ वर

## सीईओ, डेप्युटी सीईओ रजेवर; कर्मचारी कार्यालयाबाहेर

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषदेवर गेल्या तीन वषारपासून प्रशासकराज असल्याने कोणत्याच अधिकारी, कर्मचाऱ्यावर वचक राहिलेला नाही. त्यात मुख्य कार्यकारी अधिकार, उपमुख्यमंत्री कार्यकारी अधिकारी आणि विभागप्रमुक रजेवर असला की, इतर दुय्यम अधिकारी आणि कर्मचारी सह्या करून थेट घर वा इतर ठिकाण गाठतात आणि सर्वसामान्यांचे कामे तसेच खोळंबून राहतात.

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान आणि पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी किशोर काळे हे दोन प्रमुख अधिकारी रजेवर असल्याने इतर खातेप्रमुख आणि कक्षाधिकारी, सहाययक प्रशासन अधिकारी उपस्थितीच्या सह्या करून थेट चहाची टपरी, घर, शेत गाठतात. आपल्या इतर कामांना चकाट्या पिटत प्राधान्य देतात. यामुळे जिल्हाभरातून दोन दिवसांच्या सुट्टीनंतर सामान्य माणसं आपल्या कामासाठी जिल्हा परिषदेमध्ये आले की, त्यांच्या कामांचा खोळंबा होतो. या बाबीकडे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान यांनी गांभीर्याने घेऊन अशा कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारावा.

## पुणे रेव्ह पार्टी प्रकरण: एकनाथ खडसेंच्या जावयाच्या अटकेवरून गंभीर आरोप

### पोलिसांनीच कोकेन ठेवलं ? दृश्यम चित्रपटासारखं



**मुंबई । प्रतिनिधी**

माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई डॉ. प्रांजल खेवलकर आणि इतर सात जणांच्या पुणे पोलिसांनी केलेल्या अटकेप्रकरणी ज्येष्ठ वकील अ‍ॅड. असीम सरोदे यांनी गंभीर आरोप केले आहेत. पुणे पोलिसांनी खासगी पार्टीला रेव्ह पार्टीचे स्वरूप देऊन कोकेनचा पुरावा 'प्लँट' केल्याचा दावा त्यांनी केला. यामुळे व्यक्तीच्या खासगी जीवन जगण्याच्या अधिकाराचे उल्लंघन झाल्याचेही सरोदे यांनी म्हटले आहे. हे प्रकरण उच्च न्यायालयात गेल्यास पुणे पोलिसांची अडचण वाढण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. पोलिसांनी रचले कारस्थान असीम सरोदे अ‍ॅड. असीम सरोदे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, पुणे पोलिसांनी राजकीय दबावाखाली हे प्रकरण दृश्यम चित्रपटाच्या शैलीत रंगवले आहे. ते म्हणाले, विश्वास नांगरे पाटील यांनी पुणे पोलीस अधीक्षक असताना खचा

▶▶ उर्वरित पान २ वर

## आणीबाणीत लढा देणाऱ्या व्यक्तींना वाढीव मानधन

### पात्र लाभार्थ्यांनी २५ सप्टेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

आणीबाणी १९७५ ते १९७७ च्या कालावधीत कारावास भोगलेल्या व्यक्ती, त्यांचे हयात जोडीदारासाठी असलेल्या मानधनात शासनाने वाढ केली आहे. यासह शासनाच्या धोरणात सुधारणा केली आहे. यासंबंधीचा शासन निर्णय २७ जून २०२५ रोजी निर्गमित केला आहे. पात्र लाभार्थ्यांनी २५ सप्टेंबर २०२५ पर्यंत विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत. त्यानंतर प्राप्त अर्जांचा विचार करण्यात येणार नसल्याचे जिल्हा प्रशासनाने कळवले आहे.

एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेल्या आणीबाणीधारकांना मासिक रु. २० हजार, त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी, पतीस रु. १० हजार, एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या आणीबाणीधारकास मासिक रु. १० हजार, त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी, पतीस रु. पाच हजार मानधन अनुज्ञेय असणार ▶▶ उर्वरित पान २ वर

## धानोरा रोड व अंकुश नगर रोडसाठी आंदोलन, उपोषणाची वर्षपूर्ती आज खड्ड्यात लोटांगण आंदोलन



**बीड । प्रतिनिधी**

गेल्या १० वर्षापासून शहरातील नगर रोड ते पालवन चौक असलेल्या अगदी पावणे दोन किलोमीटर रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे. त्याचबरोबर मदर तेरेसा चौक ते अंकुश नगर मुख्य रस्ता, विठ्ठल चौक पर्यंत हा रस्ता गेल्या १५ वर्षापासुन केलाच नाही. परंतु याकडे नगरपरिषद तसेच जिल्हा प्रशासन दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे येणाऱ्या २९ जुलै तारखेला धानोरा रोडच्या मुख्य रस्त्यामधील खड्ड्यामध्ये लोटांगण आंदोलन केले जाणार आहे.

त्यामुळे या रस्त्याचे रुंदीकरण नूतनीकरण व कॉंक्रिटीकरण करण्याच्यादृष्टीने नगरपरिषदेने सुवर्ण जयंती नगरोत्थान मधून प्रस्ताव दाखल केला आहे याला तांत्रिक मान्यता मिळाली असून प्रशासकीय मान्यता बाकी आहे असे असले तरी या रस्त्याच्या कामात भूसंपादन प्रक्रियेमुळे मोठी अडचण निर्माण झाली आहे. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना, महिला, वृद्ध नागरिक, व्यापारी, वाहन धारकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्याचबरोबर या धानोरा रोडलगत डॉ. मदर तेरेसा चौक ते अंकुश नगर, आगलावे ईस्टेट, विठ्ठल चौक हा ३ कि.मी. चा मुख्य रस्ता आहे. १५ गेल्या वर्षापासुन केलाच नाही, त्यामुळे येथील रहिवाशीयांना मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. यासाठी अनेक आंदोलने, उपोषणे करण्यात आली आहेत. व या आंदोलनाला

▶▶ उर्वरित पान २ वर

## हर हर महादेव...जिल्ह्यातले शिवालय भक्तांनी फुलले



**बीड । प्रतिनिधी**

श्रावणी सोमवारनिमित्त बीड जिल्ह्यातले ठिकठिकाणचे देवालय भक्तांच्या मांदियाळीने गजबजल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत असून बारा ज्योतिलिरगापैकी एक असलेल्या परळीतील प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेण्यासाठी देशभरातून भाविकांनी परळीत गर्दी केल्याचे दिसून येते. कंकालेश्वर, कपीलधार, सौताडा, गोरक्षनाथ टेकडी यासह अन्य गडांवर आणि शिवालयांमध्ये हर हर महादेवचा गजर ऐकावयास मिळत आहे.

श्रावण महिन्याचा पहिला सोमवार असल्याने शिवशंभेचे दर्शन घेण्यासाठी जिल्हाभरातल्या शिवालयांमध्ये भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी पहावयास मिळत आहे. बारा ज्योतिलिरगापैकी एक असलेल्या परळीतील प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेण्यासाठी देशभरातून मोठ्या संख्येने भाविक परळीत डेरेदाखल झाले. दुपारी बारा वाजेपयरत ५० हजारापेक्षा जास्त भाविकांनी प्रभू वैदद्यनाथाचे भक्तीभावाने दर्शन घेतले. त्यासह बीड जिल्ह्यातील कपीलधार, सौताडा, कंकालेश्वर, गोरक्षनाथ टेकडी, सोमेश्वर यासह जिल्ह्यातील शिवालयांमध्ये भाविकांची गर्दी आणि शिवशंभोच्या जयजयकाराने अस्मांत दुमदुमून गेल्याचे पहावयास मिळाले.

## नामदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त श्री.सोमेश्वर महादेव मंदिर येथे विविध कार्यक्रम



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण वातावरण मंत्री तथा बीड जिल्ह्याच्या माजी पालकमंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड येथील प्रसिद्ध असलेल्या सर्व भाविकांच्या नवसाला पावणाऱ्या अशा श्री भगवान सोमेश्वर महादेवाच्या मंदिरामध्ये आज शेकडो भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये देव देश आणि धर्म या ब्रीद वाक्याला अनुसरून भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा सोमेश्वर मंदिराचे ट्रस्टी विश्वस्त मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील सह एडवोकेट गोविंद शिराळे पाटील सह सर्व विश्वस्त टीमच्या वतीने श्री सोमेश्वर भगवान श्री महादेवाला महाआरती करण्यात आली या महाआरतीनंतर येथे शेकडो भाविक भक्त आज पहिला सोमवार असल्यामुळे श्री भगवान सोमेश्वर महादेवाच्या दिव्य स्वरूपाच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यांना केळी या महा प्रसादाचे वाटप देखील भारतीय जनता पार्टीचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या वतीने करण्यात आले आणि सर्व शेकडो भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये भगवान श्री सोमेश्वराला प्रार्थना करण्यात आले की बीड जिल्ह्याच्या भूमी कन्या श्रीमती पंकजाताई मुंडे यांना उदंड आयुष्य लाभो अशी सर्वांच्या वतीने श्री ईश्वराकडे प्रार्थना करण्यात आली यावेळी येथे उपस्थित असलेले सर्व बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिक पत्रकार वकील डॉक्टर्स इंजिनिअर तसेच सर्व भाविक भक्त शेकडोच्या संख्येने उपस्थित होते.



# वाघ... केवळ शिकारी नव्हे, तर जैवशृंखलेचा श्वास!

भारतीय संस्कृतीत वाघ हे केवळ वन्य प्राणी नाही, तर सामर्थ्य, शौर्य आणि पर्यावरणीय संतुलनाचे प्रतीक मानले गेले आहे. देवी दुर्गेच्या वाहनापासून ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या तोफांवरील कोरीव वाघापर्यंत याचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. याच वाघाच्या संवर्धनासाठी दरवर्षी २९ जुलै रोजी जागतिक व्याघ्र दिन साजरा केला जातो – एक दिवस केवळ प्राण्यांसाठी नाही, तर आपल्याच संवेदना जागवणारा.

वाघ हा अन्नसाखळीतील सर्वोच्च शिकारी असला, तरी त्याचे अस्तित्व म्हणजे संपूर्ण जैवविविधतेचे आरोग्य. एक वाघ सुमारे ५0 ते १00 चौ.किमी परिसर व्यापतो आणि त्या अधिवासातील अनेक प्रजाती, झाडे, जलस्रोत यांचे संरक्षणही नकळत घडते. म्हणूनच म्हटले जाते – वाघ वाचला, तर जंगल वाचेल आणि जंगल वाचले, तर माणसाचे आयुष्यही सुरक्षित राहील. एकेकाळी भारतात ४0 हजार वाघ होते, परंतु अविचारी शिकारी व जंगलतोडीमुळे १९७२ पर्यंत केवळ १,४00 इतकी संख्या उरली. या घटलेल्या संख्येच्या पार्श्वभूमीवर ‘प्रोजेक्ट टायगर’ ही ऐतिहासिक मोहीम सुरू झाली आणि आज भारतात पुन्हा ३,१६७ वाघ अस्तित्वात आहेत – जगातील सर्वाधिक!

महाराष्ट्रातील वाघ संवर्धनात जळगाव जिल्ह्याचाही वाटा वाढतो आहे. विशेषतः यावल प्रादेशिक वनविभागात २011 नंतर पुन्हा वाघ दाखल झाला. मेळघाटातून वाघ वाघदऱ्या, वढोदा रेंजमार्गे स्थलांतर करून यावलच्या जंगलात येतो, हे आता संशोधनातून सिद्ध झाले आहे. २०२४ मध्ये ट्रॅप कॅमेऱ्यात स्पष्टपणे वाघाचे दृश्य नोंदवले गेले. २०२५ मध्ये गौताळा–ऑट्रामघाट परिसरातही अशाच प्रकारच्या वाघाच्या उपस्थितीच्या बातम्या मिळाल्या. यावल विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक समाधान पाटील यांच्या माहितीनुसार सध्या यावल परिसरात दोन वाघ



ट्रांझिट अवस्थेत आहेत, तर मुक्ताईनगर भागात ‘बनाना टायगर’ म्हणून ओळखला जाणारा वाघ अधूनमधून दिसून येतो. त्याचप्रमाणे पाल जंगल सफारी मार्गावर वाघाच्या पावलांचे चिन्हही अलीकडेच आढळले आहेत आणि जंगल सफारी लवकरच सुरु होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत.

या साऱ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर, यावल प्रादेशिक वनविभागात १२ मे २०२४ रोजी बुद्ध पौर्णिमेच्या लख्ख चांदण्यात पार पडलेली वन्यप्राणी गणना ही एक वेगळाच अनुभव देणारी ठरली. यामध्ये चोपडा, वैजापूर, अडावद, देवझिरी, यावल (पूर्व–पश्चिम), आणि रावेर अशा सातही वनक्षेत्रात एकूण ३९ मचानींवर प्राणीगणना झाली. ८० निसर्गप्रेमींनी सहभाग घेतला आणि एकूण ५८४ वन्य प्राण्यांची नोंद झाली. यामध्ये निलगाय, चिंकारा, भेकर, सांबर, चौशिंगा, काळवीट यांसारखे शाकाहारी, तसेच बिबट, लांडगा, कोल्हा, रानमांजर, तरस, अस्वल यांसारखे शिकारी प्राणी दिसून आले. विशेष म्हणजे रावेर वनक्षेत्रात एक वाघ आणि चार बिबटांचे प्रत्यक्ष दर्शन झाले. हे सर्व प्राणी वाघाच्या नैसर्गिक अधिवासात सहअस्तित्व करणारे आहेत, म्हणूनच ही प्रजाती साखळी वाघाच्या अस्तित्वाला पूरक ठरते.

या संपूर्ण उपक्रमाचे यश हे केवळ वनविभागाचे नसून संपूर्ण जिल्ह्याचे आहे. जिल्हा प्रशासनाचे सहकार्य, निसर्गप्रेमींचा उत्साह, आणि श्रीमती निनू सोमराज (म. वनसंरक्षक), जमीर शेख (उपवनसंरक्षक), समाधान पाटील (सहायक वनसंरक्षक), तसेच चोख प्रशासन व मैदानातील वन अधिकारी व कर्मचाऱ्यांचे समन्वयाने हे शक्य झाले.

वाघ वाचवणे म्हणजे केवळ एक प्रजाती वाचवणे नव्हे, तर हवामान, पाणी, माती, जंगल आणि पर्यायाने आपलेच भविष्य सुरक्षित ठेवणे होय. म्हणूनच आपण सर्वांनी जंगलतोड रोखणे, शिकारीविरोधात आवाज उठवणे, पर्यावरण शिक्षण वाढवणे आणि जबाबदार पर्यटनाला प्रोत्साहन देणे या गोष्टींकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

आजच्या दिवशी, जागतिक व्याघ्र दिनाच्या निमित्ताने आपण संकल्प करूया –

वाघ वाचवा, जंगल वाचवा, जीवन वाचवा!

– युवराज पाटील, जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव

# डिजिटल युगातला उपवास : संयम, शांती आणि सजगतेचा नवा मार्ग

उपास हा शब्द केवळ अन्नत्यागाशी मर्यादित नाही, तर त्याचा खरा अर्थ आहे – 'उप' म्हणजे जवळ, आणि 'वास' म्हणजे राहणं. म्हणजेच देवाच्या जवळ जाण्याचा, आपल्या आत्म्याच्या शुद्धीचा, आणि मनाच्या शांतीचा एक पवित्र मार्ग.

भारतीय संस्कृतीतील उपवास: हिंदू धर्मात उपवास हा एक आध्यात्मिक शुद्धीचा मार्ग मानला जातो. श्रावण मास, एकादशी, चतुर्थी, महाशिवरात्र, चातुर्मास या काळात लोक आहारावर संयम ठेवतात, भजन–पूजन करतात, व्रत पाळतात आणि वाईट विचारांपासून दूर राहतात. उपासाने केवळ शरीर नव्हे तर मन, वाणी आणि वृत्तीही शुद्ध होतात. आजच्या ताणतणावाच्या जीवनात, ही परंपरा आपल्याला मानसिक आरोग्यासाठीही मार्गदर्शक ठरते.

इस्लाम धर्मात रमजान महिन्यात मुस्लीम बांधव उपवास (रोजा) पाळतात. सूर्योदयापूर्वी ‘सेहरी’ आणि सूर्यास्तानंतर ‘इफ्तार’ हा त्याचा क्रम असतो. रोजा म्हणजे केवळ उपाशी राहणे नव्हे, तर नजरेचा, वाणीचा, वर्तनाचा संयम. मन आणि शरीराचे शुद्धीकरण हे यामागचे प्रमुख उद्दिष्ट.

ख्रिश्चन धर्मात लेंट (Lent) हा एक पवित्र काळ आहे, ज्यात ४० दिवस उपवास, प्रार्थना आणि पश्चात्ताप केला जातो. या काळात त्याग, सेवा, संयम आणि आध्यात्मिक चिंतन याला महत्त्व दिलं जातं.

जैन धर्मात उपवास हा आत्मशुद्धी आणि कर्मनिर्जरा (कर्मांचा नाश) करण्यासाठी केला जातो. पर्जुषण पर्व, संयम, एकासन, सल्लेखना ही काही त्याची उदाहरणं आहेत.

बौद्ध परंपरेत संयम, मौन, ध्यान आणि मध्यम मार्ग याला महत्त्व. काही विशिष्ट उपासना दिवसांवर साधू आणि उपासक आहारसंयम आणि मौन पाळतात.

आधुनिक काळातील गरज: 'डिजिटल उपवास'



आज मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया याने माणूस यंत्रवत आणि व्यस्त झाला आहे. शरीर जागेवर आहे, पण मन भटकतंय – स्क्रोल करतंय, तुलना करतंय, अस्वस्थ राहतंय. तंत्रज्ञानाचा अतिरेक – हेच आजच्या काळातलं 'मनाचं प्रदूषण' आहे. मोबाईलशिवाय आपण काही क्षणही शांत बसू शकत नाही. वेळ वाया जातो, नातं दूर जातं, आणि आपण स्वतःपासूनही दूर जातो. म्हणूनच, तंत्रज्ञानाचा ताळमेळ साधण्यासाठी आणि मानसिक आरोग्यासाठी 'डिजिटल उपवास' ही काळाची गरज बनली आहे.

डिजिटल उपवास कसा करावा?

संपूर्ण दिवस नको, तरी आठवड्यातून काही तास खालीलप्रमाणे ठरवा:

– मोबाईल विरहित वेळ: रोज १–२ तास ठरवून पूर्णतः मोबाईल बंद.

– नेट विरहित रविवार: इंटरनेट बंद, घरच्यांसोबत गप्पा, मैत्र, वाचन.

– टीव्ही/स्क्रीन टाईम कमी: मानसिक विश्रांती आणि संवाद वाढवा.

– वाचन, ध्यान, लेखन, भजन: यासाठी वेळ राखीव ठेवा.

एकत्रित उपवास: धार्मिक व डिजिटल

– पारंपरिक उपवासात जशी अन्नाची शुद्धता, तशी डिजिटल उपवासात विचारांची शुद्धता.

– उपवासाच्या दिवशी सोशल मीडियापासून थोडं दूर राहा.

– पोस्ट टाकण्याऐवजी आत्मचिंतन करा.

– मोबाईल बाजूला ठेवा आणि स्वतःशी जोडा.

जग बदललंय, पण आत्म शुद्धीची गरज तीच आहे.

उपास म्हणजे अन्नाचा त्याग नव्हे, तर आपल्या अशुद्ध सवयींचा त्याग आहे.

आजचा माणूस तंत्रज्ञानाच्या महासागरात इतका गुरफटला आहे की त्याला स्वतःशी संवाद साधायलाही वेळ उरलेला नाही. अशा वेळी 'डिजिटल उपवास' ही केवळ एक कल्पना न राहता, मानसिक आरोग्य, नातेसंबंध आणि आत्मिक शांती यासाठी आवश्यक असा नवा जीवनशैलीचा भाग बनला पाहिजे. पारंपरिक उपवास जसा शरीरशुद्धीसाठी उपयुक्त आहे, तसाच डिजिटल उपवास हा मनशुद्धीसाठी आवश्यक आहे. थोडा वेळ मोबाईल, स्क्रीन आणि सोशल मीडियापासून दूर राहून आपण आत्मपरीक्षण, वाचन, ध्यान आणि निसर्गाच्या सान्निध्यात रमायला शिकलो, तर आपण अधिक सजग, शांत आणि समाधानी जीवन जगू शकतो. संयम, शांती आणि सजगतेकडे जाणारी ही वाटचाल म्हणजेच डिजिटल युगातला खरा उपवास आहे. पारंपरिक उपवासाची जागा डिजिटल संयम घेऊ शकतो. जेवढं आपण देवाजवळ जाण्यासाठी व्रत करतो, तेवढाच तंत्रज्ञानावर ताबा ठेवणं – हाच खरा भक्तीमार्ग आहे.

आत्मसंयमाने जीवन जगू या. पारंपरिक श्रद्धा आणि आधुनिक शिस्त यांची सांगड घालू या. डिजिटल उपवास म्हणजेच नव्या युगातील योग उपासना आहे!

– इंजि. सौ. शितल अ. सवासे

◆ पान ४ वरून पुढे...

## 'तू गलत...

कोण वाल्मिक? त्याची औकात काय?

शिवराज बांगर म्हणाले की, वाल्मिक हा कोणय? त्याची ओकात काय? तो गुन्हेगार आहे? पण त्याच्यामागे जी शक्ती आहे ती धनंजय मुंडेंची आहे. धनंजय मुंडेंना हात झटकून चालणार नाही. वाल्मिकने जे केलं, ते धनंजय मुंडेंसाठी आता एकट्या वाल्मिकवर ब्लेम टाकून चालणार नाही. शिवाय संतोष देशमुख खून प्रकरणात ४० कॉल हे धनंजय मुंडेंचे आरोपींसोबत झालेले आहेत. पूर्ण तपास होईपर्यंत धनंजय मुंडेंना क्लिनचीट मिळणार नाही. सरकार तुमचं नसतं तर ९ नंबरचा आरोपी तुम्ही असते, असा घणाघात बांगर यांनी केला.

## पुणे रेव्ह...

रेव्ह पार्टीवर कारवाई केली होती. रेव्ह पार्टी म्हणजे मोठ्या आवाजातील संगीत, गर्दी आणि नशेच्या पदार्थांचा समावेश असतो. पण या प्रकरणात सात जण एका घरात दारू आणि बिअर पित होते. घरात दारू पिणे हा गुन्हा नाही. तरीही पोलिसांनी राजकीय हेतूने वाला रेव्ह पार्टीचे स्वरूप दिले. कोकेनचा पुरावा 'प्लॅंट' केल्याचा आरोप– सरोदे यांनी पोलिसांवर थेट आरोप करताना म्हटले, डॉ. प्रांजल सोवलकर हे एकनाथ खडसे यांचे जावई आहेत. पोलिसांनी दोन ग्रॅम कोकेन सापडल्याचा दावा केला, पण जामीन मिळू नये म्हणून सात मिलिग्रॅम कोकेन जास्त दाखवण्याची व्यवस्था केली. हे पुरावे पोलिसांनीच प्लॅंट' केले. राजकीय सूचनांनुसार पोलिसांनी हे कटकारस्थान रचते आणि एक बनावट चित्र उभे केले. व्हिडीओ व्हायरल करून बदनामी– पोलिसांनी या कारवाईचा व्हिडीओ व्हायरल करून संशयितांना समाजासमोर गुन्हेगार ठरवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप सरोदे यांनी केला. ते म्हणाले, 'हा व्हिडीओ व्हायरल करणे म्हणजे खासगी जीवनाच्या हक्कांचे गंभीर उल्लंघन आहे. पोलिसांनी कोणताही पंचनामा न करता धाड टाकली आणि कोकेनचा पुरावा प्लॅंट केला. न्यायालयात प्रकरण येण्यापूर्वीच व्हिडीओ व्हायरल करून एकनाथ खडसे यांची बदनामी करण्याचा डाव रचला गेला. पोलिसांचे राजकीय पोलिसिंग थांबावे

सरोदे यांनी पुढे म्हटले, पोलिसांचा वापर राजकीय हितासाठी होत आहे. हे राजकीय पोलिसिंग थांबले पाहिजे. या प्रकरणात पोलिसांनी खासगी जीवनाच्या हक्कांचा भंग केला आहे. यामुळे पुणे पोलीस अडचणीत येऊ शकतात. त्यांनी हे प्रकरण उच्च न्यायालयात जाण्याची शक्यता व्यक्त केली.

रोहीणी खडसे रात्री आयुक्तलयात दाखल – दरम्यान, सोमवारी सकाळी रोहिणी खडसे आणि आमदार रोहित पवार पोलिस आयुक्तांची भेट घेणार होते, मात्र अचानक त्यांनी दोरा रद्द केला. त्यानंतर रात्री आठ वाजताच्या सुमारास रोहीणी खडसे पोलिस आयुक्तालयात दाखल झाल्या. सकाळी त्या आणि रोहीत पवार पोलिस आयुक्तांची भेट घेणार होत्या. परंतू रात्री रोहीणी खडसे एकट्याच आयुक्तलयात आल्या. त्यांनी गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त निखील पिंगळे यांची भेट घेतली. भेटी दरम्यान, दोघांत ड्रग पार्टीच्या आरोपावरून त्यांच्या पतीवर दाखात असलेल्या गुन्ह्याबाबत चर्चा झाली. रोहीणी खडसे यांनी गुन्ह्याचा तपास पारदर्शक पद्धतीने व्हावा. गोग्य तीच कारवाई व्हावी. कोणावरही अन्याय होता कामा नये, अशी मागणी त्यांनी केल्याचे उपायुक्त पिंगळे यांनी सांगितले.

प्रकरणाची पार्श्वभूमी–पुणे पोलिसांनी डॉ. प्रांजल खेवलकर आणि इतर सात जणांना रेव्ह पार्टी प्रकरणात अटक केली. पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत असीम सरोदे यांनी याला राजकीय कारस्थान ठरवले आहे. या प्रकरणाने राजकीय वर्तुळात खळबळ उडवली असून, येत्या काळात याचे पडसाद उच्च न्यायालयात उमटण्याची शक्यता आहे.

## आणीबाणीत....

आहे. मानधनासाठी अर्जदाराचे अटकेच्यावेळी किमान १८ वय असण्याची अट आणि १४ डिसेंबर २०२३ रोजीचे शासन पत्र क्र. संकीर्ण १९२२/प्र.क्र.१९७/स्वासैक–१ देखील या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आले आहे. आणीबाणीत कारावास भोगलेली व्यक्ती ०२ जानेवारी २०१८ पूर्वी हयात नसेल, तर त्यांच्या पश्चात असलेल्या हयात जोडीदाराला (पती/पत्नी) मानधन मिळवण्यासाठी परिशिष्ट 'ब' मधील शपथपत्र अर्जासोबत जोडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावे लागेल. अशा प्रकरणांमध्ये मानधन मंजुरीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना असतील. आणीबाणी काळात कारावास भोगलेली व्यक्ती किंवा त्याची पत्नी, पती, यापैकी कोणीही एक हयात असेपर्यंतच मानधन अनुज्ञेय असेल. त्यानंतर कायदेशीर वारस मानधन किंवा थकबाकीसाठी अर्ज करू शकणार नाहीत, असे शासन निर्णयात नमूद आहे.

## धानोरा रोड...

उपोषणाला एक वर्ष पूर्ण झाले. परंतु नगरपरिषद व जिल्हा प्रशासन या रस्त्याच्या प्रश्ना बाबत गांभीर्याने घेत नाही तसेच लोकशाही मार्गाने आमरण उपोषण सुरू असताना नगरपरिषद प्रशासनाने रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे लेखी आश्वासन दिले होते मात्र ते देखील पूर्ण केले नाही त्यानंतरही अनेक वेळा निवेदनाद्वारे कारवाईची मागणी करण्यात आली. मात्र याकडे वेळोवेळी जाणुन बुजुन दुर्लक्ष करण्यात येत असल्याने दि.२९ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता आंदोलन, उपोषणाची वर्षपूर्ती म्हणून धानोरा रोडच्या मुख्य रस्त्यामधील खड्डामध्ये लोटांगण आंदोलन करण्यात येणार आहे. तरी या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन नितेश उपाध्ये, साहस आदोडे व बीड शहर बचाव मंचाच्या वतीने करण्यात आले आहे.

◆ पान १ वरून पुढे...

## मंत्री पदासाठी...

करून त्याची भुमिका माजलगावातील एका वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आत्तापर्यंत ओबीसी समाजाच्या नेत्यांना मंत्रीपद दिले आहे म्हणुन राजकीय क्षेत्रात बीड जिल्हा ओबीसी समाजाच्या नेत्यांना मंत्रीपद देण्यास राखीव असुन मराठा आमदाराला मंत्री पद मिळाले आहे. राकाँने मराठा समाजाचा मतदानासाठी वापर केला आहे आणि ते मराठा समाजाचे असल्याने त्यांना मंत्री पद मिळाले नाही असा आरोप आ.सोळंके यांनी केला तर स्मरण शक्ती जागृत करून ते म्हणाले की,सुंदररावजी सोळंके साहेबां नंतर मराठ्यांच्या एकलाही कॅबिनेट मंत्री पद मिळाले नाही.

## शेती क्षेत्रात...

इफको व सरदार कंपनी आणि कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने बीड तालुक्यातील मौजे हिवरापाहाडी येथे आज पीएम प्रणाम किसान संगोष्टी अंतर्गत नॅनो टेक्नॉलॉजी कृषी तंत्रज्ञान मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमास पंचायत समिती सदस्य श्री कांता शिंदे, सरपंच श्री अशोक शिंदे, उपसरपंच श्री राजेंद्र पालवे, सर्व ग्रामपंचायत सदस्य चेअरमन, मंडळ कृषी अधिकारी श्री अंबुरे साहेब, उप कृषी अधिकारी

◆ पान १ वरून पुढे...

श्री जांभळकर साहेब, सहाय्यक कृषी अधिकारी श्री शिंदे, श्री खामकर श्री शेळके व मोठ्या संख्येने शेतकरी वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गोरे गोवर्धन यांनी केले, तर प्रस्ताविकामध्ये श्री शेळके यांनी हिवरापहाडी गावाची भौगोलिक माहिती सविस्तर सांगितली. यानंतर मंडळ कृषी अधिकारी श्री अंबुरे साहेब यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांना दिली. इफको कंपनीचे सय्यद सर यांनी नॅनो टेक्नॉलॉजी अंतर्गत नॅनो युरिया डीएपी खता विषयी सखोल मार्गदर्शन केले. तसेच सरदार कंपनीचे श्री शिवराज वाला यांनी सरदार या कंपनीचे विविध खतांविषयी माहिती दिली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व शेतकऱ्यांना चहापान देण्यात आला. कार्यक्रमाची सांगता निवडक शेतकऱ्यांना बक्षीस देऊन आभार प्रदर्शन करण्यात आले.

## रुग्णसेवेचा वसा...

ग्रामीण भागातील रुग्णांना तातडीने उपचार मिळण्यासाठी डॉ.योगेश व डॉ.तेजस्विनी कराड यांचे 'तांबवेश्वर आयसियू यूनिट ' हे वरदान ठरणार असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. या युनिटच्या माध्यमातून खरी रुग्णसेवा घडेल असा विश्वास आपल्या भाषणात सर्वांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन शिवाजी हंगरगे यांनी तर आभार श्रीधर कराड यांनी मानले.

◆ पान १ वरून पुढे...

## महारुद्र माडेकर...

(अध्यक्ष– महात्मा फुले विद्या प्रतिष्ठान, पुणे), मा. काशिनाथ भातगुणकी सर (अध्यक्ष– ड्रीम फाउंडेशन, सोलापूर) यांच्यासह इतर विविध क्षेतारील मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला असून सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शाल, मानाचा फेटा, डॉ. कलाम यांचे ग्रंथ व रोप देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

## जलदगती चाचणी...

बीड रेल्वेसाठी गेल्या ४० वर्षांपासून स्वातंत्र्य सैनिक ,रेल्वे मागणी आंदोलन समिती, रेल्वे कृती संघर्ष समिती, अनेक नागरीक युवा कार्यकर्ते यांनी रस्त्यावर उतरून संघर्ष केला आहे. वेळप्रसंगी आंदोलकांना जेलमध्येही जावे लागले आहे. अहिल्यानगर – बीड – परळी या २६१ किलोमीटर रेल्वे मार्गावरील ८० टक्के रेल्वे रूळ अंथरण्याचे आणि रेल्वे स्टेशन उभारणीचे काम कामही मार्गी लागले आहे. ४ फेब्रुवारी २०२५ रोजी बीड स्थानकापर्यंत रेल्वेची जलदगती चाचणी घेण्यात आली. या मार्गावरील इलेक्ट्रीक जोडणी काम अद्याप पूर्ण मार्गावर झालेले नाही हे काम पूर्ण झाल्यानंतरच नियमित रेल्वे सुरू होऊ शकते.सध्या विघनवाडी पर्यंत काम पूर्ण झालेले आहे. ईलेक्ट्रीक जोडणी अभावी बीडला रेल्वे धावण्याचे काम रखडले असुन

◆ पान १ वरून पुढे...

या कामाला गती देऊन तातडीने पूर्ण करण्यात यावे. दिशा चुकली म्हणून पावणे तीन कोटींचा पुल पाडला; पुल पाडण्यासाठी २० लाखाचा खर्च आणि नविन पुलासाठी १५ कोटी संबंधित अभियंता व कंत्राटदार यांच्यावर प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करावी बीड तालुक्यातील च–हाटा रोडवरील पालवण फाटा येथील २ कोटी ७० लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेला पुल लोहमार्गाची व पुलाची दिशा यांचा अंदाज चुकल्याने निरुपयोगी ठरला असुन रेल्वे पुल पाडण्याचे काम सुरू आहे. आता पुल पाडण्यासाठी २० लाख रुपये खर्च असुन नविन पुल बांधण्यासाठी १५ कोटी रुपये खर्च येणार आहे. जनतेच्या पैशाचा अपव्यय असुन संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून संबंधित रेल्वे विभागाचे अभियंता आणि लोहमार्ग पुलाचे काम करणारी ठेकेदार कंपनी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करून नुकसान भरपाईची रक्कम शासन तिजोरीत जमा करण्यात यावी पावसाळ्यात रेल्वे पुलाखाली पाणी साचत असल्याने ग्रामस्थांची वाहतुकीची अडचण ; उपाययोजना करण्यात यावी बीड जिल्ह्यातील अहिल्यानगर –बीड– परळी या रेल्वे मार्गावरील रेल्वे पुलांची पाहणी करुन पुलाखालचे पाणी काढुन देण्याची व्यवस्था न केल्याने पाणी साचत असुन बीड तालुक्यातील पालवण चौक,नवगण राजुरी,जरूड,बाभुळखुंटा येथील रेल्वे पुलाखाली पाणी साचल्याने ग्रामस्थांची वाहतुकीची अडचण होत असुन संबंधित प्रकरणी आवश्यक उपाययोजना करण्यात यावी .

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# शासकीय कर्मचाऱ्यांच्या सोशल मीडिया वापराबाबत मार्गदर्शक सूचना; शासन निर्णय निर्गमित

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी सोशल मीडियाचा वापर करण्याबाबत नवे मार्गदर्शक नियम जाहीर केले असून त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

डिजिटल युगात सोशल मीडिया हे संवादाचे प्रभावी साधन असले तरी त्यातून गोपनीय माहितीचा प्रसार, खोटी माहिती पसरवणे, तसेच शासकीय नियमांचे उल्लंघन होवू नये याकरिता मार्गदर्शक तत्त्वे आखण्यात आली आहेत. सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ हे सोशल मीडियाच्या वापराबाबतही लागू राहतील. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.



महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना : राज्य शासनातील अधिकारी–कर्मचारी, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम तसेच प्रतिनियुक्तीने किंवा करारपद्धतीने नेमलेले कर्मचारी यांना हे नियम लागू राहणार आहेत.

शासनाच्या किंवा भारतातील कोणत्याही शासनाच्या चालू किंवा अलिकडच्या धोरणावर प्रतिकूल टीका करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच सोशल मीडियाचा वापर जाणीवपूर्वक आणि जबाबदारीने करावा.

वैयक्तिक आणि कार्यालयीन सोशल मीडिया अकाऊंट स्वतंत्र ठेवावेत. केंद्र किंवा राज्य शासनाने बंदी घातलेल्या वेबसाईट किंवा ॲपचा वापर करू नये. शासकीय योजना व उपक्रमांच्या प्रसारासाठी केवळ अधिकृत आणि प्राधिकृत माध्यमांचा वापर करावा.

कार्यालयीन कामकाजाच्या समन्वयासाठी व्हॉट्सॲप, टेलिग्रामसारख्या मेसेजिंग प्लॅटफॉर्मचा वापर करता येईल.

शासकीय योजनांच्या यशस्वितेसंदर्भात सोशल मीडियावर पोस्ट करता येईल; मात्र त्यातून स्वयंप्रशंसा होणार नाही याची दक्षता घ्यावी. वैयक्तिक अकाऊंटवर शासकीय पदनाम, लोगो, गणवेश, शासकीय मालमत्तेचे फोटो किंवा व्हिडिओ अपलोड करू नयेत. आक्षेपार्ह, द्वेषमूलक, भेदभाव करणारा मजकूर पोस्ट किंवा फॉरवर्ड करणे मनाई आहे. प्राधिकृत मंजुरीशिवाय कोणतेही गोपनीय दस्तऐवज सोशल मीडियावर अपलोड करू नयेत. बदली झाल्यानंतर कार्यालयीन सोशल मीडिया अकाऊंट योग्य प्रकारे हस्तांतरित करावे.

शासनाने स्पष्ट केले आहे की, या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर शिस्तभंगात्मक कारवाई केली जाईल. डिजिटल युगात सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर व्हावा आणि शासकीय यंत्रणेचा विश्वासार्हता अबाधित राहावी, यासाठी नियमावली करण्यात आली आहेत.

## उद्योजक तथा लेखक प्रकाश सुलाखे डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी स्मृती पुरस्काराने सन्मानित

**मुंबई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मूळचे रहिवाशी तथा पुणे येथील क्व्हमॅक इंजिनिअरिंग प्रा लि चे उद्योजक तथा लेखक प्रकाश आत्माराम सुलाखे यांना डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी स्मृती पुरस्कार २०२५ या प्रतिष्ठित पुरस्कार सन्मान सोहळ्यात गेस्ट ऑफ ऑनर म्हणून गौरविण्यात आले आहे,तसेच क्व्हमॅक इ इंजिनिअरिंग प्रा लि या कंपनीला प्रथम पुरस्कार टॉप ब्रँड इन इंजिनिअरिंग एज्युकेशनल लॅब इक्विपमेंट मॅन्युफॅक्चर म्हणून देण्यात आला आहे,टॉपनॉच फाउंडेशन आयोजित या कार्यक्रमाला अनेक मान्यवर व्यक्तींनी उपस्थिती लावली होती.

या सोहळ्यात प्रकाश सुलाखे यांच्यासोबत प्रसिद्ध अभिनेता आणि समाजसेवक सोनू सूद,खा तथा माजी मुख्यमंत्री नारायण राणे, तसेच विधानसभा अध्यक्ष राहुल नारवेकर,फाऊंडेशनचे सीईओ करूनसिंग व पदाधिकारी उपस्थित होते. या पुरस्कार सोहळ्यात भारतभरातील विविध




प्रतिष्ठित उद्योजकांना सन्मानित करण्यात आले आहे. शिक्षण क्षेत्रातील दूरदृष्टी असलेले उद्योजक आणि लेखक प्रकाश आत्माराम सुलाखे यांच्या दुसऱ्या पुस्तकाचे एपसळपशशीळपस एर्वीलरींळेप: झरळप ी ऋश्रळप या पुस्तकाचे प्रकाशन मुंबई येथील प्रसिद्ध हॉटेल ताज येथे एका भव्य आणि प्रतिष्ठित समारंभात झाले. या सोहळ्याला माजी मुख्यमंत्री खा.नारायण राणे आणि प्रसिद्ध अभिनेता व समाजसेवक सोनू सूद,विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर,फाऊंडेशनचे सीईओ करून सिंग,यांच्या उपस्थितीमुळे या क्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

भारतातील अभियांत्रिकी शिक्षणातील आव्हाने आणि भविष्यातील संधी यावर आधारित हे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी, पालकांसाठी, शिक्षकांसाठी आणि धोरणकर्त्यांसाठी मार्गदर्शक ठरेल.तांत्रिक शिक्षणाच्या नवविचार आणि परिवर्तनासाठी प्रकाश सुलाखे यांचा हा प्रयत्न एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.इंजिनिअरिंग क्षेत्रातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही पुस्तके अभ्यासपूर्ण असणार आहेत,यापूर्वी देखील सुलाखे यांना पणजी येथे गोव्याचे मुख्यमंत्री, प्रसिद्ध अभिनेत्री खा हेमा मालिनी यांच्या हस्ते बेस्ट उद्योजक म्हणून गौरविण्यात आले होते,त्यांच्या या यशाचे माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर,प्रसिद्ध विधिज्ञ कालिदास थिगळे,लोकप्रश्नचे संपादक दिलीप खिस्ती,जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे,प्रमोद कुलकर्णी ,विकास उमापूरकर ,मिलिंद सुंदर ,उदय जोशी,दीपक सर्वज्ञ, दिव्यअग्नी चे संपादक प्रकाश सुर्यकर,कार्यकारी अभियंता शिवप्रसाद खेडकर ,दिनकर कदम,विलास बडगे,अरुण डाके, नानासाहेब काकडे, गणपत डोईफोडे, गंगाधर घुमरे, गिरीश देशपांडे, साहस अदोडे, यांच्यासह बीड येथील पत्रकार आणि मित्र परिवाराने कौतुक केले आहे,लोकांक्षाचे संपादक तथा माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे पीआरओ प्रशांत सुलाखे यांचे ते लहान बंधू आहेत.

## ’जनता’च्या माजी विद्यार्थ्यांचा अनोखा गेट टुगेदर

### 33 वर्षांनंतर अविस्मरणीय सोनेरी आठवणींना उजाळा !




**कडा । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील धानोरा येथील जनता विद्यालयाच्या १९९२-९३ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा अविस्मरणीय स्नेह मिलन सोहळा अर्थात गेट टुगेदर नगरच्या आनंदबन वॉटर पार्कमध्ये जल्लोषात साजरा करण्यात आला .कालप्रवाहात हरवलेली मित्रमैत्रिणीची साथ, गालातल्या हसण्यांनी भरलेले आठवणींचे क्षण, आणि त्या निरागस बालपणाचा सोनेरी सुवास – हे सगळं पुन्हा अनुभवायची दुर्मिळ संधी नुकतीच लाभली.धानोरा येथील जनता विद्यालयाच्या १९९२-९३च्या इयत्ता दहावीच्या बॅचने तब्बल ३३ वर्षांनी एकत्र येत आपल्या जुने दिन पुन्हा उजाळले. रविवार दिनांक २७ जुलै रोजी आनंदबन वॉटर पार्क, या निसर्गरम्य ठिकाणी आयोजित करण्यात आलेला हा गेट टुगेदर, खरं तर आठवणींचा महाउत्सव ठरला. कार्यक्रमाची सुरुवात झाली ती निवेदिका ज्योती गोरे यांच्या बहारदार हृदयस्पर्शी आणि ओघवत्या निवेदनाने. त्यांच्या शब्दांच्या सुरेल लयीने सर्व वातावरण मंत्रमुग्ध झाले. जुन्या आठवणी, शालेय खोड्या, गुरुजनांचे संस्कार,आणि मैत्रीची अनमोल नाती,या साऱ्यांनी संपूर्ण कार्यक्रमाला एक भावनिक आणि आनंददायी वळण दिलं.दिवसभर वॉटर पार्कमधील जलक्रीडा, पूलमध्ये पोहण्याचा अनुभव आणि संगीतात रंगलेली थिरकती पावलं, या साऱ्या गोष्टींनी सहभागींचा उत्साह शिगेला पोहोचवला. सर्वांनी बालपण परत जगल्याचा आनंद ओसंडून वाहत होता.मनोरंजक खेळ, विनोदी प्रसंग, गाण्यांचे जल्लोष, आणि पुन्हा एकदा आपले असल्याची भावना, या साऱ्या आठवणींना कॅमेर्याने टिपण्याची घाई सर्वत्र दिसत होती. प्रत्येक चेहरा आनंदाने उजळलेला होता.सर्व वर्गमित्र मैत्रिणींसोबत एकत्रित स्नेहभोजनाचा आस्वाद घेताना, प्रत्येकाच्या मनात एकच भावना होती,ही भेट क्षणिक असली, तरी तिचा ठसा आयुष्यभरासाठी अजरामर राहणार! एकंदरीत हा स्नेह मिलन सोहळा सहभागी झालेल्या सर्वांच्याच आयुष्यातील आनंददायी अविस्मरणीय अनुभव होता जो कायम स्मरणात राहील .

## आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त रेड रन स्पर्धेत सौ. के. एस.के.(काकू) कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा सहभाग

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष जिल्हा रुग्णालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त जिल्हास्तरीय रेड रन स्पर्धेचे आयोजन दिनांक २८ जुलै २०२५ रोजी सकाळी ८:३० वाजता वाय जंक्शन, चऱ्हाटा रोड, बीड येथे करण्यात आले. या स्पर्धेमध्ये के.एस.के. (काकू) कृषी महाविद्यालय, बीड येथील दोन विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून ५ किलोमीटरचे अंतर यशस्वीरित्या पूर्ण करत उल्लेखनीय कामगिरी बजावली. सन्मानित विद्यार्थी: रोहन वखरे, ँ भारत खेडकर– या विद्यार्थ्यांचा मा. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत व जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर यांच्या हस्ते मेडल व सहभागी प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

## अंथरवण पिंप्री आश्रमशाळेची विद्यार्थीनी तेजस्वीनी राठोड भारतीय आवकाश संशोधन संस्थेस भेटीसाठी पात्र

**बीड । प्रतिनिधी**

इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणार्या खाजगी अनुदानित विजाभजन अश्रम शाळा /विद्यानिकेतन शाळा / ऊसतोड कामगारांच्या शाळेतील निवासी विद्यार्थ्यांना अंतराळ संशोधनाबद्दल अधिक माहिती मिळावी, या क्षेत्रात स्वरस्य निर्माण व्हावे तसेच विद्यार्थ्यांना ISRO ची यशोगाथा आणि विज्ञान जागृत करण्याची संधी मिळावी म्हणून राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा/ विद्यानिकेतन शाळा/ ऊसतोड कामगारांच्या शाळेतील एकूण शंभर विद्यार्थ्यांना ISRO या संस्थेत भेट देण्याकरता दिनांक २७.७.२०२५ रोजी स्पर्धात्मक परीक्षा घेण्यात आली. त्या परीक्षेचा निकालही आज जाहीर करण्यात आला. या परीक्षेत श्री सद्गुरु बंजारा सेवा संघ बीड संचलित उच्च माध्यमिक आश्रम शाळा अंथरवन पिंपरी तांडा तालुका बीड येथील विद्यार्थिनी कु. राठोड तेजस्विनी राम ही पात्र ठरली आहे. त्याबद्दल श्री.सद्गुरु बंजारा सेवा संघ संस्थेचे अध्यक्ष दिनेशराव पवार, सचिव अतुलभाऊ पवार तसेच सुशील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुशीलभाऊ पवार पुढील उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## मंजूषा शिंदेंच्या गायनाने गाजणार अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव!

### ● कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे समितीचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

साहित्य, सामाजिक न्याय आणि क्रांतीशील विचारसरणीचे प्रणेते साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात साहित्य सम्राट गौरव महोत्सव उत्साहात साजरा होणार आहे. हा भव्य महोत्सव सोमवार, दि. २८ जुलैपासून १ ऑगस्टपर्यंत विविध कार्यक्रमांसह रंगणार आहे.त्या अनुषंगाने बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे, बुधवार



दि.३० जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता ख्यातनाम गायिका मंजुषा शिंदे यांचा संगीत रजनी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जयंती उत्सव समितीने केले आहे.

डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बीड शहर यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.समितीचे अध्यक्ष बळीराम गवते आणि सचिव सुनील पाटोळे यांनी बीडमधील नागरिकांना या गौरव सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून तैलीक साहू महासभाचे राष्ट्रीय अध्यक्ष जयदत्त क्षीरसागर, उदघाटक युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, तर प्रमुख पाहुणे म्हणून अमृतलाल सारडा,शेख निजाम, सुभाष लोणके, अविनाश जाधव, विलास बामणे, सचिन मुळूक, अमर नाईकवाडे, ॲड. अविनाश गंडले, भारत कांबळे, विलास मोमीन, दादासाहेब मुंडे,बालासाहेब गुंजाळ,राम सिंग टाक,अविनाश जोगदंड उपस्थित राहणार आहेत. अण्णाभाऊ साठेंच्या विचारांचा जागर घडवणारा आणि तरुण पिढीला प्रेरणा देणारा हा महोत्सव बीडकरांसाठी अभिमानाचा ठरणार आहे.

## पद्माक्षी’तर्फे बीडमध्ये खरेदीचा महाउत्सव - २९ व 30 जुलैला विविध स्टॉल्स ग्राहकांच्या सेवेत

**बीड । प्रतिनिधी**

बीडकर ग्राहकांसाठी एकाच छताखाली विविध वस्तू खरेदी करण्याची सुवर्णसंधी पुन्हा एकदा उपलब्ध झाली आहे. ‘पद्माक्षी’तर्फे आयोजित करण्यात आलेल्या व्यावसायिक प्रदर्शनात २९ आणि ३० जुलै २०२५ रोजी अमृत मंगल कार्यालय, सुभाष रोड, बीड येथे विविध स्टॉल्स उभारले जाणार आहेत. या स्टॉल्समध्ये राख्या, देवांचे वस्त्र, साड्या, ड्रेसेस, कुर्ते, रेडीमेड कपडे, दागदागिने आणि कलात्मक वस्तू खरेदीसाठी उपलब्ध असतील. प्रदर्शनात विविध ठिकाणचे नागरिक व्यापारी आणि उद्योजकांनी आपापले खास उत्पादने मांडली असून, ग्राहकांना दर्जेदार आणि आकर्षक वस्तू खरेदी करण्याची संधी मिळणार आहे.

हा उपक्रम पद्मा हेमंत बियाणी व मीनाक्षी अमित सिकची, तसेच श्री गजानन एजन्सीज, शीतल होलसेल साडी डेपो यांच्या पुढाकाराने राबवला जात आहे. बीडकर नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि स्थानिक व्यावसायिकांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# नांदेडच्या एकाच अपिलार्थीचे ८१ अपील राज्य माहिती आयोगाने फेटाळले; १९ अपिलार्थींचे ७ हजार ५६७ व्दितीय अपील फेटाळले

**बीड । प्रतिनिधी**

नांदेड येथील जनक रामराव गायकवाड या अपिलार्थीने राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत दाखल केलेले ८१ द्वितीय अपील आयोगाने फेटाळले आहेत. यासोबतच १९ अपिलार्थीनी दाखल केलेले ७ हजार ५६७ व्दितीय अपील आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळले आहेत.

अपिलार्थी यांनी विविध ग्रामपंचायत कार्यालयाकडे ८१ माहितीचे अर्ज सादर केलेले आहेत. अशा मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज करणाऱ्या खालील नमूद अपिलार्थी यांची द्वितीय अपिले आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळलेली आहेत. आयोगाकडील सदरील निर्णय आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहेत.

बहुतांश अपिलार्थी कार्यालयाकडे वारंवार अर्ज सादर करतात. अपिलार्थी व्यक्तिशः माहितीची मागणी करुन त्याप्रमाणे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कार्यालयात उपस्थित राहत नाहीत. अपिलार्थी यांनी जेवढ्या ग्रामपंचायत कार्यालयाकडे माहिती अर्ज सादर केले त्या सर्व ग्रामपंचायत कार्यालयात स्वतंत्र जन माहिती अधिकारी पदनिर्देशित आहेत. मात्र अशा सर्व जन माहिती अधिकारी यांचेसाठी केवळ एकच प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित आहेत. बहुतांश वेळा अपिलार्थी जेवढे माहितीचे अर्ज दाखल करतात जवळजवळ तेवढेच प्रथम अपिले दाखल करतात. या परिस्थितीत दैनदिन कामकाज सांभाळून अपिलाची यांच्या दाखल प्रथम अपिलावर कार्यवाही करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. मोठ्या संख्येने प्राप्त झालेल्या अर्जाचा विपरित परिणाम दैनंदिन शासकीय कामकाजावरुन होऊन सर्वसामान्य नागरिकांना नैसर्गिक न्याय देता येणे शक्य होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपिले दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नसल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोघम स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे अशा स्वरुपाचे माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी विविध ग्रामपंचायत कार्यालयाकडे ८१ माहितीचे अर्ज सादर केलेले आहेत या अपिलार्थी यांची व्दितीय अपिले आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळलेली आहेत. आयोगाकडील सदरील निर्णय आयोगाच्या www. sic.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

प्रस्तुत प्रकरणात संबंधितांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग यांनी वेळोवेळी पारित केलेले निर्णय विचारात घेता, एकाच व्यक्तीने मोठ्या संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत अपेक्षित नाही. यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालयास / प्राधिकरणास वेठीस धरत आहेत. त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालये, प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाज ठप्प होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. अशा मोठ्या स्वरुपात अर्ज करण्याच्या सवयीमुळे संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडून सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे, त्या महत्वाच्या शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्थान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येत आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे.

पुढील अपीलार्थीची आयोगाने द्वितीय सुनावनी घेवून अपीले फेटाळली आहेत. केशवराव निंबाळकर यांची आयोगाकडे दाखल २७८८ द्वितीय अपिले २६ जुन २०२४ तर ८४२ द्वितीय अपिले १९ डिसेंबर, २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. शरद दाभाडे यांची १५९ द्वितीय अपिले २६ एप्रिल, २०२४ तर ९८५ द्वितीय अपिले २७ सप्टेंबर, २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. मोतीराम गयबु काळे यांची आयोगाकडे दाखल ४६३ द्वितीय अपिले २३ सप्टेंबर, २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. बाळासाहेब भास्कर बनसोडे यांची आयोगाकडे दाखल २५६ द्वितीय अपिले २० डिसेंबर, २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. श्रीमती अनिता नितीन वानखेडे यांची आयोगाकडे दाखल ११६ द्वितीय अपिले ०६ सप्टेंबर २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. बाबुराव धोंडु चव्हाण यांची आयोगाकडे दाखल १९८ द्वितीय अपिले २० जानेवारी २०२५ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. जयभीम नरसिंगराव सोनकांबळे यांची आयोगाकडे दाखल १७६ द्वितीय अपिले ०१ ऑक्टोबर २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. हरि प्रताप गिरी यांची आयोगाकडे दाखल २९६ द्वितीय अपिले २८ ऑगस्ट २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. विनोदकुमार भारुका यांची आयोगाकडे दाखल २३६ द्वितीय अपिले २८ ऑगस्ट २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. गिरीश म. यादव यांची आयोगाकडे दाखल २०६ द्वितीय अपिले २३ ऑगस्ट २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. संजय हाबु राठोड यांची आयोगाकडे दाखल १०० द्वितीय अपिले ३० ऑगस्ट २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. रायभान किसन उघडे यांची आयोगाकडे दाखल २१६ द्वितीय अपिले ३० सप्टेंबर २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. बालाजी बळीराम बंडे यांची आयोगाकडे दाखल १५६ द्वितीय अपिले ०१ ऑक्टोबर २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. भालचंद्र साळुंके यांची आयोगाकडे दाखल १०३ द्वितीय अपिले २४ जानेवारी २०२५ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. मिलिंद दगडु मकासरे यांची आयोगाकडे दाखल १२५ द्वितीय अपिले ३० ऑगस्ट २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. ज्ञानेश्वर धायगुडे यांची आयोगाकडे दाखल ८६ द्वितीय अपिले २४ जानेवारी २०२५ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. सुरज नंदकिशोर व्यास यांची आयोगाकडे दाखल ६३ द्वितीय अपिले २४ जानेवारी २०२५ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत.

दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

● जिल्हा विशेष ● मंगळवार, दि. २९ जुलै २०२५ ● पान ४

## थोडक्यात

### दिंद्रुड चा कोतवाल शुभम बनला राज्य राखीव पोलीस दलातील जवान



**दिंद्रुड । प्रतिनिधी**

नऊ वर्ष महसूल मंडळात कोतवाल म्हणून काम केले, पोलीस दलात जाण्याची आईची इच्छा पूर्ण करण्यासाठी बंद खोलीत अभ्यास केला, रात्रंदिन अंग मेहनत घेतली, शेवटी फळ मिळाले आणि दिंद्रुड चा कोतवाल शुभम राज्य राखीव पोलीस दलातील जवान झाला. माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड नजदीक असलेल्या चोपनवाडी हे शुभम काटेचे गाव आहे. घरची परिस्थिती प्रचंड हालाखीची, आई सविता या आशा वर्कर तर वडील मुकुंद हे शेतात काम करतात. नऊ वर्षांपासून शुभमने कोतवाल म्हणून दिंद्रुड तलाठी सज्जात काम केले. राज्यराखीव पोलीस दलातील मामाची प्रेरणा घेत मला ही पोलीस व्हावे हि आईची इच्छा पुर्ण करायची होती. त्यासाठी गेल्या ४ वर्षांपासून कोतवाल हि जवाबदारी पार पाडत अभ्यास व प्रचंड अंग मेहनत घेतली. दिंद्रुड सज्जाचे तलाठी प्रमोद चव्हाण सह आई वडिलांनी प्रोत्साहन दिले या बळावर शुभम काटे ची राज्य राखीव पोलीस दलातील जवान म्हणून प्रशिक्षणासाठी ७ ऑक्टोबर २०२४ रोजी निवड झाली. राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र नानवीज, दौंड येथे नुकतेच प्रशिक्षण पुर्ण झाले. यापुढे राज्य राखीव पोलीस बलात सशस्त्र पोलीस शिपाई म्हणून काम करताना आता आई-वडिलांची व जनतेची सेवा करायला मिळणार याचा आनंद असल्याची शुभम काटे सांगतो.

**● माझा मुलगा शुभम मेहनती व प्रामाणिक आहे, त्याची पोलीस होण्याची जिद्द शेवटी पूर्ण झाली. आता तो देशात नागरिकांची सेवा करेल याचा आनंद आहे. भविष्यात मोठा अधिकारी व्हावा हेच माझे स्वप्न आहे. -सविता मुकंद काटे, आई**

**● शुभम काटे हा कोतवाल असताना सांगितलेले कामे प्रमाणिकपणे पूर्ण करणारा, ध्येय पूर्ण करण्यासाठी चिकाटीने अभ्यास करणारा तसेच दिंद्रुड महसूल सज्जाचा होतकरू कर्मचारी होता. त्याची एसआरपीत भरती झाल्याचा आनंद आहे. - प्रमोद चव्हाण, तलाठी दिंद्रुड सज्जा**

### बहुजन शिक्षक संघटनेचे बीड शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी साहेब यांच्यासोबत बैठक संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषद अंतर्गत कार्यात असणाऱ्या शिक्षकांच्या विविध विषयावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना निवेदन देण्यात आले सदर बैठक ही शिक्षणाधिकारी प्राथमिक श्री भगवानराव फुलारी यांनी बैठकीस खालील विषयावर चर्चा करण्यात आली त्यामध्ये राज्याध्यक्ष विजयकुमार समुद्रे ,उपशिक्षणाधिकारी भगवानराव सोनवणे , राज्य सचिव विनोद कुमार कांबळे , शिक्षक नेते शेख मुसा विभागीय अध्यक्ष बबनराव पंडित, निवेदक महादेव इनकर सहभागी होते. १) शिक्षकांची विविध प्रसून है ऑनलाईन फाईलनेच सादर करुन मंजूर करावीत व शिक्षकांना त्या संचिकेचे क्रमांक घ्यावा. जेणेकरुन त्या शिक्षकांना आपले प्रकरण कुठपर्यंत आले आहे व कोणत्या टेबलला थांबले आहे हे पाहता येईल. २) शिक्षकांचे नियमित वेतन हे। तारखेला शासन निर्णयानुसार होणे अपेक्षित आहे. ज्या महिन्यामध्ये बजेट लवकर येऊनही शिक्षण विभाग, वित्त विभाग, अधिकारी, कर्मचारी हे जाणीवपूर्वक विलंब लावतात व शिक्षकांचे वेतन हे शासन निर्णयानुसार गेली अनेक वर्षापासून होत नाहीत याचा आढावा घेऊन विलंबास जवाबदार असणा-या अधिकारी, कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करावी. ३) संच मान्यता २०२४-२५ नुसार शिक्षकांचे अगोदर समायोजन करुन बदल्या होणे अपेक्षित असतानाही अतिरिक्त पदावर शिक्षकांच्या बदल्या झाल्या असून या प्रकरणी शासनाकडून योग्य ते मार्गदर्शन घेऊन उचित कार्यवाही करावी, ४) शासनाच्या नवीन अधिसूचनेनुसार केंद्रप्रमुख यांची प्राथमिक पदवीधराची सेवाजेष्ठता यादी प्रकाशित करुन पदोन्नती (दर्जावाढ) सेवाजेष्ठतेप्रमाणे देण्यात यावी. शिक्षण विस्तार अधिकारी, मुख्याध्यापक व प्राथमिक पदवीधरासाठी पदोन्नती प्रक्रिया राबविण्यात यावी. ५) प्राथमिक पदवीधर शिक्षकांचे विकल्प घेऊन विषय बदल करण्यात यावा. ६) १२ वर्षे व २४ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या शिक्षकांना निवड वेतनश्रेणीचे लाभ देतांना ज्येष्ठ शिक्षकांना डावलून कनिष्ट शिक्षकांना वेतनश्रेणीचा लाभ देण्यात आला आहे. याची चौकशी करून कारवाई करण्यात यावी. तसेच वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रलंबित प्रस्ताव तात्काळ निकाली काढण्यात यावे. वरील सर्व विषयावर भगवानराव फुलारी शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी सारा वार चर्चा करून प्रत्येक प्रश्न तात्काळ निकाली काढल्या जाईल अशी आश्वासन दिले आणि कार्यालयामध्ये झिरो पेंडन्सी कशी आणता येईल यावरती आम्ही विशेष प्रयत्न करू व शिक्षकांना न्याय देण्याचे काम करू असे सांगितले प्रसंगी बैठकीमध्ये राज्याध्यक्ष विजयकुमार समुद्रे ,उपशिक्षणाधिकारी भगवानराव सोनवणे , राज्य सचिव विनोद कुमार कांबळे , शिक्षक नेते शेख मुसा विभागीय अध्यक्ष बबनराव पंडित, निवेदक महादेव इनकर , श्याम कुमार फटाले ' अमर सारडा, रिजवान नूर अनिल शिंदे सर सहभागी होते .

# मंत्री पदासाठी आमदार प्रकाश सोळंके यांनी पेटवला ओबीसी, मराठा वाद ?

## पक्ष नेतृत्वाला ओढले जातीय समीकरणात !

**माजलगाव । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत स्वत:च्या पुतण्याच्या विश्वासघात करुन याना-त्या कारणाने पक्षा कडून स्वत:लाच उमेदवार मिळवणारे माजलगावचे आमदार प्रकाशदादा यांना त्यांची मंत्री पदाची जिज्ञासा पुर्ण झाली नव्हती म्हणुन संतोष देशमुख यांच्या खुनानंतर मराठा वाद निर्माण करुन धनंजय मुंडे यांनी मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा या मागणीसाठी आंदोलनात अग्रेसर भुमिका घेतली होती. यात सर्वच समदु:खी एकत्र आल्याने धनंजय मुंडे यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला आणि आता त्यांनी कृषी खात्याचे मंत्री असताना त्यांच्या विरोधात याचिकेवर उच्च न्यायालयाने क्लीन चिट दिली आहे. यातच २५ जुलै रोजी पुणे येथे ना.अजितदादा पवारांनी धनंजय मुंडे यांचा पुन्हा मंत्रिमंडळात समावेश करण्याबाबत चर्चा करून निर्णय घेतला जाईल असे सांगितले होते यावर आमदार प्रकाशदादा सोळंके भलतेच भडकले व त्यांनी मराठा आरक्षणावर वादग्रस्त वक्तव्य केले होते आणि त्यावर घटलेली दुर्दैवी घटना घडली होती हे सर्वांना माहीत आहेच. पण याची पुन्हा पुन्हा उजळणी म्हणून की, राजकीय जातीय समीकरण बिघडले पाहिजे म्हणुन आ.सोळंके यांनी ना.अजित पवार यांच्या नमुद बोलण्याचा विपर्यास ▶▶ उर्वरित पान २ वर

### राकाँनेच दिले होते ६ खात्यांचे राज्य मंत्री, परभणीचे पालकमंत्री ; प्रकाश दादांना विसर !

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार)वर दबाव आणण्याचा प्रयत्न करुन मंत्रीपद ओबीसीचे आरक्षण असल्याचे सांगणाऱ्या प्रकाश दादांना शरद पवार यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सरकारच्या काळात मराठा आमदार म्हणुन ६ खात्यांचे राज्य मंत्री, परभणीचे पालकमंत्री केले होते आणि ते दिड दोन वर्षांच्या कालावधीतच अजित पवारांची राजकीय डावपेच आखत प्रकाश दादांचे मंत्री पद काढले होते आणि त्या काळातील अत्यंत विश्वासु मराठा आमदार सुरेश धस यांना मंत्रीपद देण्यात आले होते. राहिला प्रश्न कॅबिनेट मंत्री पदाचा तर शिवाजीराव पंडित, सुरेश नवले हे कॅबिनेट मंत्री नव्हते काय असा प्रश्न सामान्य नागरिकांच्या चर्चेतुन उपस्थित केला जात आहे.**



*बीड माजलगाव अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा पदभार स्वीकारल्या बद्दल मा. विलासजी जाधव साहेब यांचे स्वागत करतांना समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य अँड सुभाष भाऊ राऊत, शहराध्यक्ष निखील शिंदे*

## शेती क्षेत्रात आधुनिक नॅनो टेक्नॉलॉजी काळाची गरज

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन कृषी विभागामार्फत विविध योजना राबवल्या जातात. २१ या शतकात आधुनिक शेती करताना नॅनोटेक्नॉलॉजी चा वापर करणे काळाची गरज आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री साळवे साहेब, उपविभागीय कृषी अधिकारी श्री गर्जे साहेब, तालुका कृषी अधिकारी श्री साळी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे ज्ञान दिले जात आहे. कृषी निविष्ठा डीलर संघटना राष्ट्रीय अध्यक्ष श्री कलंत्री साहेब यांच्या नियोजना खाली ▶▶ उर्वरित पान २ वर



## रुग्णसेवेचा वसा जोपासताना प्रामाणिकपणा हा यशाचा धागा : डॉ.विठ्ठल लहाने

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टरांनी रुग्णसेवेचा वसा जोपासत असताना प्रामाणिकपणा हाच यशाचा धागा असल्याचे मत सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने यांनी व्यक्त केले. दिंद्रुड येथील तांबवेश्वर हॉस्पिटल व आयसीयू युनिटच्या उद्घाटन प्रसंगी रविवारी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमास माजलगाव तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.मधुकर घुबडे, सपोनि महादेव ढाकणे, पंढरी अर्बनचे अध्यक्ष सुरेश तिडके, शिवाजीराव बडे, बंडू खांडेकर, विकास बडे, रामचंद्र बसेट यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ.लहाने पुढे बोलताना म्हणाले की, रुग्णसेवा करताना रुग्णांवर आपली उपचार करण्याची पद्धत, उपचार केल्याचे आपण त्यांच्याकडुन कसे पैसे घेतो व पिडीत रुग्ण आपल्या सेवेप्रति व्यक्त करत असलेली कृतज्ञता यावर आपले भविष्य निर्भर आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर




### आई-वडिलांच्या हस्ते उद्घाटन

**डॉ.योगेश यांनी वैद्यकीय क्षेत्रात मास्टर डिग्री मिळवली.पुणे मुंबईच्या ठिकाणी दवाखाना चालू करून अमाप पैसे जमा करण्यापेक्षा आई-वडिलांच्या ग्रामीण भागातील रुग्णांना तातडीने उपचार मिळावे या स्वप्नाची स्वप्नपूर्ती करण्यासाठी कराड यांनी दिंद्रुड सारख्या ग्रामीण ठिकाणी आयसीयू युनिट चालू केले. आई सत्वशीला व वडील श्रीधरराव यांच्या शुभहस्ते फीत कापत या युनिट चे उद्घाटन करण्यात आले.**

## महारुद्र माडेकर यांना डॉ.कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार प्रदान

**माजलगाव । प्रतिनिधी**


सोलापूर येथील ड्रीम फाऊंडेशन यांच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे देण्यात येणारा डॉ. कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार या वर्षी 'नोकरी मार्गदर्शन केंद्र' बीड चे संस्थापक संचालक मा. महारुद्र माडेकर यांना प्रदान करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए पी.जे. अब्दुल कलाम यांच्या १० व्या पुण्यतिथीचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना सदरील पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

अतिशय तळागाळातील ग्रामीण बेरोजगाराला उपलब्ध असलेल्या इंग्रजी माध्यमातील संकेतस्थळाचा वापर करून पाहिजे तेवढे रोजगाराच्या संधी शोधणे शक्य होत नसल्याने विशेतः ग्रामीण भागातील उमेदवारांची दाखल घेऊन देशातील पहिले मराठी नोकरी विषयक संकेतस्थळ तयार करून बेरोजगार युवक- युवतीकरिता रोजगाराच्या मुख्यप्रवाहाच्या वाटेवर येण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल सदरील पुरस्कारासाठी मा. महारुद्र माडेकर यांच्या नावाची निवड समितीने केली होती. सदरील पुरस्कार रविवार दिनांक २७ जुलै २०२५ रोजी सोलापूर येथे ज्येष्ठ वैज्ञानिक व डॉ. कलाम सरांसोबत काम केलेले मा. श्री. डॉ. अशोक नगरकर यांच्या हस्ते व वे. मु. श्री. बसवराज शास्त्री (सोमेश्वर मठ), मा. व्यंकटेश गंभीर, मा. प्रकाश राठोड (माजी सह आयुक्त व अध्यक्ष- सेवा फाउंडेशन), मा. श्री. प्रा. व्ही. एस. अंकलकोटे ▶▶ उर्वरित पान २ वर



# जलदगती चाचणी झाली पण इलेक्ट्रीक जोडणी अभावी बीडला रेल्वे धावेना

## सदोष रेल्वेपुल प्रकरणात कारवाईसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन : डॉ.गणेश ढवळे







**बीड । प्रतिनिधी**

बहुचर्चित, बहुप्रतिक्षित आणि जिल्ह्याच्या विकासात मैलाचा दगड ठरणारा अहिल्यानगर -बीड- परळी लोहमार्ग पुर्णत्वाकडे जात असुन रेल्वे रूळ अंथरणे, रेल्वे स्टेशन उभारणीचे कामही मार्गी लागले असले तरी या मार्गावर इलेक्ट्रिक जोडणीचे काम रखडलेले असल्याने जलदगती चाचणी होऊनही बीडला रेल्वे कधी धावणार? असा प्रश्न बीडकरांना पडला आहे. रखडलेले काम तातडीने पूर्ण करावे या मागणीसह च-हाटा रोडवरील पालवण फाटा येथील पावणे ३ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेला पुल पाडण्याचे काम सुरू आहे हा जनतेच्या पैशांचा अपव्यय असुन संबंधित अभियंता आणि कंत्राटदार यांच्याकडून नुकसानभरपाई वसूल करण्यात यावी व तसेच बहुतांश रेल्वे पुलाखाली पावसाळ्यात पाणी साचत असल्याने ग्रामस्थांना वाहतुकीची अडचण येते त्यामुळे पाण्याचा निचरा करण्याची उपाययोजना करावी या प्रमुख मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२८ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करून जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, सुदाम तांदळे , पांडुरंग हराळे,अशोक येडे जिल्हाध्यक्ष (आप), रामधन जमाले जिल्हाध्यक्ष( इंटक), जरांगे पाटील, किष्किंधा पांचाळ , शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील आदी सहभागी होते.

▶▶ उर्वरित पान २ वर